**महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,**
**समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**
**नामपूर.ता. बागलाण जि. नाशिक**

**अर्थशास्त्र विभाग व IQAC**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, महात्मा गांधी विद्यामंदिरयांच्या सहकार्याने एक दिवशीय वेबिणार**

विषय :- **'नवीन आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्पात झालेले बदल'**

**दि.०५ मार्च २०२२**

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२**

**वेबिणार अहवाल**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपुर, येथे अर्थशास्त्र विभाग व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळ महात्मा गांधी विद्यामंदिर नाशिक यांच्या सहकार्याने, एक दिवशीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय अर्थसंकल्प २०२१-२२ सादर झाल्यानंतर महात्मा गांधी विद्यामंदि संस्थेतील प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी आणि त्यांना अर्थसंकल्प समजावा यासाठी **'नवीन आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्पात झालेले बदल'** या विषयावर दिनांक ०५ मार्च २०२२ रोजी एक दिवशीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिणारसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रताप कॉलेज (स्वायत्त), अमळनेर येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रो. डॉ. विजय मांटे हे उपस्थित होते.

'नवीन आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्पात झालेले बदल' या वेबिणारचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य डॉ. उज्जन कदम हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल भारद्वाज ह्या उपस्थित होत्या.महात्मा गांधी विद्यामंदिर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.एन.एन.गाढे, सर्व सदस्य उपस्थित होते.

डॉ. विजय मांटे यांनी 'नवीन आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्पात झालेले बदल' या विषयावर बोलताना डॉ. मनमोहन सिंग यांनी कशाप्रकारे आर्थिक धोरण निश्चित केले आणि त्यामुळे अर्थसंकल्प मांडत असताना जागतिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून कशाप्रकारे बदल होत आहेत. याविषयी चर्चा केली. तसेच नवीन आर्थिक धोरणानंतर उत्पन्न करापासून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाली आहे असे प्रतिपादन केले.

डॉ. मृणाल भारद्वाज यांनी वेबिनरसाठी शुभेच्या दिल्या आणि हा विषय सर्व विद्याशाखेशी संबंधित आहे आणि महत्त्वाचा आहे आसे प्रतिपादन केले.

प्राचार्य डॉ. उज्जन कदम यांनी हा विषय जागतिक घडामोडी लक्षात घेता विद्यार्थ्यांसाठी खूप उपयोगी आहे आणि डॉ. विजय मांटे यांनी मांडलेले विचार समाजोपयोगी आहेत. अर्थसंकल्प हा चालू घडामोडी डोळ्यासमोर ठेऊन सादर केला जातो. सदर अर्थसंकल्प हा जागतिक घडामोडी डोळ्यासमोर ठेवून मांडलेला अर्थसंकल्प आहे असे मत व्यक्त केले.

या वेबिनारसाठी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेतील अर्थशास्त्राचे सर्व प्राध्यापक, विभाग प्रमुख तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि इतर महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महादेव क्षीरसागर यांनी केले, पाहुण्यांची ओळख महिला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मीना पाटील यांनी करून दिली तर आभार प्रदर्शन महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव येथील प्रा. डॉ. बी.एम. सोनवणे यांनी केले.




vijay mante is presenting
MEANING
According to "Gaston Gaze"- The Budget in modern stag is a forecasting of an estimate of all public receipts and expenses.
According to constitution Budget means the annual financial statement containing and estimate of all anticipated revenue and expenditure of the government for the coming financial year
Sonusing Patil can now join this meeting
Ujjan Kadam
Utkarsha Dhoondge
ankita bhamare
Sonusing Patil
Vaman Mandwade
neha pawar
40 others
You
wri-vyza-mdu


Ujjan Kadam
vijay mante
Dr. B. M. Sonawane
ankita bhamare
Utkarsha Dhoondge
SAGAR PAWAR
neha pawar
vandana bachhav
24 others
wri-vyza-mdu


vijay mante is presenting
You
Ujjan Kadam
Dr. B. M. Sonawane
SAGAR PAWAR
vandana bachhav
Dr. Veena Nare
sunil jadhav
31 others
wri-vyza-mdu

दै. लोकनामा

दि.०९ मार्च २०२२

# समाजश्री प्रशांतदादा हिरे महाविद्यालयात वेबिनार

लोकनामा प्रतिनिधी

नामपूर : येथील समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि अर्थशास्त्र अभ्यासमंडळ महात्मा गांधी विद्यामंदिर (नाशिक) यांच्या सहकार्याने नवीन आर्थिक धोरण व अर्थसंकल्पात झालेले बदल या विषयावर एकदिवसीय वेबिनार झाले.

प्रा. डॉ. उज्जन कदम अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुण्या महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल भारद्वाज होत्या. डॉ. विजय मांटे, डॉ. भारद्वाज, प्राचार्य डॉ. कदम यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. महादेव क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. मीना पाटील यांनी करून दिली. प्रा. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.